# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

**जा.क्र.कबचौउमवि/१६/ बातमी/२०२५** **दि.१९ ऑगस्ट, २०२५**

जळगाव दि. १९ प्रतिनिधी : विकसित भारतासोबत सुरक्षित भारत घडवणे महत्त्वाचे असून यासाठी प्रत्येकाने भारताचा नागरिक म्हणून सहभाग नोंदवणे गरजेचे आहे असे प्रतिपादन सेवानिवृत्त लेफ्टनंट जनरल विनोद खंडारे यांनी आयोजित व्याख्यानातून केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या कला व मानव विद्या प्रशाळेतील संरक्षण आणि सामरिक शास्त्र विभागातर्फे विद्यापीठातील अधिसभागृहात मंगळवार दि. १९ ऑगस्ट रोजी सेवानिवृत्त लेफ्टनंट जनरल विनोद खंडारे यांचे **"भविष्यातील युद्ध आणि युद्ध पद्धती"** या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले, यावेळी ते बोलत होते.

यावेळी मंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष कुलगुरू प्रा. व्ही एल माहेश्वरी, सेवानिवृत्त लेफ्टनंट जनरल विनोद खंडारे प्र. कुलगुरू प्रा. एस. टी इंगळे, राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषदेचे सदस्य राजेंद्र नन्नवरे आदी मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना श्री. खंडारे म्हणाले की, भारत हा विकसित राष्ट्राच्या दृष्टीने अग्रेसर होत असून संरक्षण मंत्रालयाच्या माध्यमातून पाच वर्षापासून देशातील युवकांसाठी त्यांच्या विविध कल्पना जाणून घेत स्टार्टअप फंडिंग सुरू करण्यात आले आहे. या माध्यमातून देशाला आर्थिक आणि युद्ध क्षेत्रात निपुण करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. यावेळी त्यांनी भारताच्या युद्धाचा इतिहास आणि आगामी काळात बदलणारी युद्धजन्य परिस्थिती ची माहिती देत भारताच्या युद्धनीतीबद्दल उपस्थितांना मार्गदर्शन केले. ऑपरेशन सिंदूर मधून नेमके काय साध्य झाले याची देखील विस्तृत माहिती त्यांनी व्याख्यानातून दिली.

अध्यक्षीय भाषण करताना कुलगुरू प्रा. व्ही एल माहेश्वरी म्हणाले की, भविष्यात सीमेवर युद्ध होणार नसून पर्यावरण, सायबर, बायोलॉजिकल युद्ध होतील त्यामुळे आपल्याला यासाठी सज्ज व्हावे लागेल. देशसेवा करण्यासाठी आपल्याला सीमेवर जाण्याची गरज नसून संविधानातील मूलभूत कर्तव्यांचे पालन करून देशाच्या विकासासाठी आपल्या परीने योगदान देण्याचा प्रामाणिक प्रयत्न सर्वांनी केला पाहिजे अशी अपेक्षा विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. माहेश्वरी यांनी विद्यार्थ्यांकडून व्यक्त केली आहे. आपल्या सेना या जगातील सर्वोत्तम सेना पैकी एक आहेत शौर्य पराक्रम आणि कौशल्य यात आपले जवान कुठेही कमी नाहीत त्यांची निष्ठा, समर्पण, राष्ट्रभक्ती हे जगात कुठेही पाहायला मिळणार नाही. त्यामुळे आपण देखील आपले काम प्रामाणिकपणे करून देशाच्या विकासासाठी हातभार लावावा असे आवाहन त्यांनी केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कला व मानवविद्या शाळेचे संचालक प्रा. रामचंद्र भावसार यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन प्रा. विना महाजन यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. तुषार रायसिंग यांनी केले. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने विद्यापीठ प्रशाळेतील विद्यार्थी उपस्थित होते.

---

मा. संपादक.

कृपया वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्दीस द्यावी ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता